## नियमित दिवाणी दावा क्र. ३८/२०१४

## सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००१९५–२०१४

## निशाणी क्र.९२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.२१ यांनी रे.दि.मु.नं.४/२०२२ आणि रे.दि.मु.नं.३८/२०१४ हे दोन्ही दावे एकत्र करून चालविण्या करिता तसेच रे.दि.मु.नं.४/२०२२ फैलावर येई पर्यंत रे.दि.मु.नं.३८/२०१४ स्थगित करण्या करिता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.२१ यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामी वादी यांनी दि.१३/०१/२०२२ रोजी श्री. भाऊ जनार्दन मुंबरकर वैगैरे १३ यांचे विरुद्ध गाव मौजे मिठमुंबरी तालुका देवगड जि. सिंधुदुर्ग येथील स.नं.४७ हि. नं.१ या मिळकती बाबत कायदेशीर वारस असल्याबाबतचा हक्क प्रस्थापनेचा ठराव, वादी हिच्या १/१५ हीश्याचे धडेवाटप, आज्ञार्थी ताकीद वैगैरे करिता दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा दाखल करतेवेळी वादी हिला वादी हिने दाखल केलेल्या दावा मिळकतीबाबत रे.दि.मु.नं.३८/२०१४ चा वाटप कारिता दावा दाखल असल्याबाबत समजले. रे.दि.मु.नं.३८/२०१४ या दाव्यामध्ये प्रस्तुत दाव्यातील वादी ही पक्षकार नाही. परंतु वादी हिने दाखल केलेल्या प्रस्तुत दाव्यातील मिळकत आणि रे.दि.मु.नं.३८/२०१४ या दाव्यातील मिळकत एकच असल्याने तसेच दोन्ही दाव्यातील काही पक्षकार सारखेच असल्याने वादी हिने दाखल केलेला दावा व रे.दि.मु.नं.३८/२०१४ हे दोन्ही दावे sister suit या संकल्पनेत मोडणारे आहे. सबब वादी हिने दाखल केलेला दावा व रे.दि.मु.नं. ३८/२०१४ यांचे एकत्रीकरण करून दोन्ही दावे एकत्रात चालविणे नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने आणि वादी करिता न्याय हितासाठी आवश्यक बनलेले आहे. वादी हिने दाखल केलेल्या दाव्या मध्ये वादी हिने हक्कप्रस्थापना, ताकीद, धडेवाटप या सारख्या मागण्या केलेल्या असल्याने वादी हीचा दावा फैलावर येई पर्यंत काही कालावधी जाणारा आहे. त्यामुळे रे.दि.मु.नं.३८/२०१४ आणि

रे.दि.मु.नं.४/२०२२ या दाव्याचे कामकाज एकत्रितपणे चालवीत असताना रे.दि.मु.नं.४/२०२२ चे कामकाज चौकशी वर येईपर्यंत रे.दि.मु.नं.३८/२०१४ चालविणे म्हणजे STAY OF SUIT होणे न्याय दृष्टीने आवश्यक बनलेले आहे. वादीने दाखल केलेला दावा रे.दि.मु.नं.४/२०२२ आणि रे.दि.मु.नं.३८/२०१४ एकत्रित न चालविल्यास व रे.दि.मु.नं.३८/२०१४ या दाव्याचे कामकाज थांबविले न गेल्यास वादी हिने दाखल केल्या दाव्यावर परिणाम होऊन वादी हिला नैसर्गिक न्यायापासून वंचित रहावे लागणारे आहे. सबब, रे.दि.मु.नं.४/२०२२ आणि रे.दि.मु.नं.३८/२०१४ हे दोन्ही दावे एकत्र करून चालविण्यात यावे व रे.दि.मु.नं.४/२०२२ फैलावर येई पर्यंत रे.दि.मु.नं.३८/२०१४ स्थगित करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर नि.क्र.९३ येथे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.२१ तर्फे दाखल नि.९२ चे अर्जातील मजूर चुकीचा व बेकायदेशीर आहे. प्रतिवादी क्र.२१ मागणी करत असलेली दाद कायद्याने मागता येणारी नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता १० नुसार नंतरचा दावा चौकशी करिता येईपर्यंत पुर्वीचा दावा स्थगित ठेवता येणारा नाही. त्यामुळे त्याबाबतची प्रतिवादी क्र.२१ ची मागणी बेकायदेशीर आहे. मुळात प्रस्तुत दावा वादींनी वाटप व ताकिदीचे दादी करीता दाखल केला आहे व या दाव्यात प्रतिवादी क्र.२१ यास पक्षकार करुन त्यांची बाजू मांडण्याची संधीही देण्यात आली आहे. प्रतिवादी क्र.२१ तर्फे दाखल नि.दि.मु.नं.४/२०२२ हा दावा ठराव, हक्क स्थापना, वाटप व ताकिद या दादी करिता असून वादीची दाव्यातील कथने पाहता प्रतिवादी क्र.२१ करीत असलेल्या दादी नि.दि.मु.नं.३८/२०१४ चे दावयाचे कामीही मिळू शकणाऱ्या आहेत. नि.दि.मु.नं.३८/२०१४ हा दावा बऱ्याच काळापासून सुनावणीसाठी आहे. याउलट, नि.दि.मु.नं.४/२०२२ च्या दाव्यात अद्याप बजावणी पुर्ण झालेली नाही. या परिस्थीतीत पुर्वी दाखल असलेला नि.दि.मु.नं.३८/२०१४ चा दावा स्थगित केल्यास दाव्याची सुनावणी आणखी अनिश्चीत काळासाठी लांबणीवर पडणार आहे.

सबब, सदर अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जदार म्हणजेच प्रतिवादी क्र.२१ यांच्या कथना नुसार रे.दि.मु.नं.३८/२०१४ व रे.दि.मु.नं.४/२०२२ मधील दावा मिळकती या सारख्याच आहेत. प्रस्तुत बाब ही प्रस्तुत दाव्यातील वादी यांनी आपल्या म्हणण्यामध्ये नाकारलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत दोन्ही दावे एकत्रितात चालविणे सोईच्या दृष्टीने तसेच वारंवारता टाळण्याच्या दृष्टीने योग्य होणार आहे. परंतु प्रतिवादी क्र.२१ यांनी रे.दि.मु.नं.४/२०२२ हा दावा फैलावर येई पर्यंत रे.दि.मु.नं.३८/२०१४ हा दावा स्थगित करण्याची मागणी केली आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होते की, रे.दि.मु.नं.३८/२०१४ हा दावा रे.दि.मु.नं.४/२०२२ यापुर्वी दाखल केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १० चे अवलोकन केले असता नंतर दाखल केलेला दावा हा स्थगित करता येऊ शकतो. परंतु पुर्वीचा दावा स्थगित ठेवता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.२१ यांची मागणी म्हणजेच रे.दि.मु.नं.४/२०२२ हा दावा फैलावर येई पर्यंत रे.दि.मु.नं.३८/२०१४ हा दावा स्थगित करावा ही कायदेशीर असल्याचे दिसून येत नाही. वरील सर्व परिस्थीतीचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज नि.क्र.९२ अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. रे.दि.मु.नं.३८/२०१४ हा दावा रे.दि.मु.नं.४/२०२२ या दाव्या सोबत एकत्रितात चालविण्यात यावा.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.01.23 16:29:25 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः २३/०१/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड